# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.08.2025** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बिहार आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर; विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करणार
2. संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित; ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयकाला मंजुरी
3. परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांच्यात प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर चर्चा आणि
4. आशियाई नेमबाजी स्पर्धेत भारतीय पुरुष संघाला सुवर्णपदक

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बिहार आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर जाणार आहेत. गया जी इथं 13 हजार कोटीरुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. यामध्ये उर्जा, रस्ते, आरोग्य, शहरी विकास आणि पाणीपुरवठा अशा विविध विकास योजनांचा समावेश आहे. तसंच मगध विद्यापीठाच्या मैदानावर आयोजित जनसभेला ते संबोधित करतील.पश्चिम बंगालमधील कोलकाता इथं कार्यकर्ता मेळाव्याला पंतप्रधान संबोधित करणार आहेत. तसंच नव्याने बांधलेल्या मेट्रो रेल्वेला हिरवा झेंडा दाखवतील आणि कोलकाता इथं 5 हजार 200 कोटी रुपयांहूनअधिक किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील.

**<u>पंतप्रधान-मार्टीन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिल्लीत उद्योगपती मार्टिन श्रोएटर यांची भेट घेतली. यासंदर्भात समाज माध्यमांवर दिलेल्या माहितीत पंतप्रधानांनी देशातल्या विपुल संधींचा शोध घेण्यासाठी आणि नवोन्मेष आणि उत्कृष्टतेसाठी प्रतिभावान तरुणांशी सहकार्य करण्यासाठी इच्छुक जागतिक भागीदारांचे देश मनापासून स्वागत करत असल्याचं नमूद केलं आहे. या भागीदारीतून केवळ भारतालाच नव्हे तर जागतिक प्रगतीसाठी फायदेशीर ठरतील असे उपाय केले जाऊ शकतात.

**<u>संसद अधिवेशन</u>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन काल अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं. या अधिवेशनादरम्यान लोकसभेत 14 विधेयकं सादर करण्यात आली आणि त्यातील 12 विधेयकं मंजूर करण्यात आली. या काळात ऑपरेशन सिंदूरवर दोन दिवस विशेष चर्चा घेण्यात आली. त्याचा समारोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तराने झाल्याची माहिती सभापती ओम बिर्ला यांनी दिली. या अधिवेशनात केवळ 37 तास काम पार पडले, असं सांगून ओम

बिर्ला यांनी नाराजी व्यक्त केली. या अधिवेशनात सदस्यांचं वर्तन आणि त्यांनी वापरलेली भाषा हे संसदेच्या प्रतिष्ठेला साजेसं नव्हतं. संसदीय शिष्टाचार राखण्यासाठी याबाबत काळजी घेणं ही सदस्यांची सामूहिक जबाबदारी आहे असं बिर्ला म्हणाले. राज्यसभेत केवळ 38 टक्के कामकाज झालं आणि 15 विधेयकं मंजूर झाली.

**<u>गेमिंग नियमन</u>**

या अधिवेशनात ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक 2025 ला मंजुरी मिळाली. ई-स्पोर्ट्स आणि सोशल गेमला प्रोत्साहन देतानाच सर्व प्रकारच्या ऑनलाइन जुगार आणि रिअल मनी गेमवर बंदी घालण्याच्या उद्देशानं तयार करण्यात आलेलं हे विधेयक लोकसभेत आधीच मंजूर झालं होतं; काल राज्यसभेत केंद्रीय इलेक्ट्रोनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ते सादर केलं.

**<u>ऑनलाईन गेम पीएम</u>**

संसदेनं मंजूर केलेल्या ऑनलाईन गेमिंगविषयी विधेयकाबाबत पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केलं आहे. सरकार ई स्पोर्टस् आणि ऑनलाइन सोशल गेम्सना प्रोत्साहन देत राहिलच. मात्र हे विधेयक पैशाच्या ऑनलाइन गेम्सच्या हानीकारक परिणामांपासून समाजाचा बचाव करेल असं समाज माध्यमांवर दिलेल्या संदेशात त्यांनी म्हटलं आहे.

**<u>रिजीजू</u>**

पावसाळी अधिवेशन फलदायी ठरल्याची प्रतिक्रिया केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी काल व्यक्त केली. अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर वार्ताहर परिषदेनंतर बोलताना, या अधिवेशनात नव्या खासदारांना बोलण्याची संधी मिळू शकली नाही याला विरोधी पक्ष जबाबदार असल्याचं ते म्हणाले. विरोधी पक्षांच्या गोंधळामुळे सदनाच्या कामकाजात अडथळा आला आणि चर्चेसाठी वेळ देऊनही ते सहभागी झाले नाहीत अशी टीका त्यांनी विरोधकांवर केली.

**<u>अर्ज दाखल</u>**

इंडीया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, शरद पवार, यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून सी. पी. राधाकृष्णन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अर्जांची छाननी आज होणार असून 25 ऑगस्टपर्यंत अर्ज मागे घेता येतील. येत्या 9 सप्टेंबरला उपराष्ट्रपतीपदासाठी मतदान होणार आहे. निवडणूक आयोगाने उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीसाठी, सुशीलकुमार लोहानी आणि डी. आनंदन या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

**<u>पंतप्रधान-मॅक्रॉन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी काल दूरध्वनीवरून संवाद साधला. पंतप्रधान कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनात याविषयी माहिती दिली असून, उभय नेत्यांनी युक्रेन आणि पश्चिम आशिया प्रदेशातल्या संघर्षाचे शांततेने निराकरण करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांविषयी चर्चा केल्याचे नमूद केले

आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी, शांतता आणि स्थिरता यांच्या पुनर्स्थापित करण्यासाठी भारताच्या अखंडीत पाठिंब्याचा पुनरूच्चार केला. या नेत्यांनी संरक्षण, नागरी अणु सहकार्य, तंत्रज्ञान आणि उर्जा क्षेत्रांसह द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला. तर राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी भारत आणि युरोपियन युनियनमधील मुक्त व्यापार करारावरील संदर्भात पाठिंबा दर्शवला आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी काल तीन दिवसांच्या दौऱ्यात मॉस्कोमध्ये रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांची भेट घेतली. तसंच, रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लाव्हरोव यांचीही भेट घेतली. प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर चर्चा करताना द्वीपक्षीय धोरणांचा आढावा घेतला. परस्पर देशांतील व्यापार संतुलित आणि शाश्वत पद्धतीने वाढवण्याचे वचनही दिले. या चर्चेनंतर झालेल्या वार्ताहर परिषदेला संबोधित करताना बिगर कराचे आणि नियामक अडथळे जलद गतीने दूर करण्याची गरज जयशंकर यांनी अधोरेखित केले. यावेळी लाव्हरोव यांच्याशी दहशतवादाशी सामना करण्याच्या मार्गांवरही चर्चा झाल्याचे ते म्हणाले. व्यापार आणि गुंतवणुकीद्वारे उर्जा सहकार्य टिकवून ठेवण्याची गरज अधोरेखित करताना, या बैठकीत जागतिक प्रशासनाच्या सुधारणांसाठी भारत -रशिया यांच्यातील सामाईक वचनबद्धतेची पुष्टी त्यांनी केली. यावेळी जयशंकर यांनी भारत - रशिया व्यापार, आर्थिक, वैज्ञानिक, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक सहकार्यावरील सरकारांतर्गत आयोगाच्या 26 व्या सत्राचे सहअध्यक्षपदही भूषवले आणि भारत-रशिया उद्योग मंचाला संबोधित केले.

**वैष्णव जादा गाड्या**

दिवाळी आणि छट पूजेसाठी 12 हजारांपेक्षा जास्त विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय भारतीय रेल्वेनं घेतला आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. 13 ते 26 ऑक्टोबर दरम्यान प्रवास सुरु करून, 17 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर दरम्यान परतीचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना परतीच्या तिकिटावर 20 टक्के सवलत दिली जाईल, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**गणेशोत्सव-रेल्वे**

गणेशोत्सवात प्रवाशांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वेने 380 गणपती विशेष रेल्वे फेऱ्यांची घोषणा केली आहे. गणेशोत्सवासाठी पश्चिम रेल्वे 56 गणपती, कोकण रेल्वे सहा आणि दक्षिण पश्चिम रेल्वे 22 फेऱ्या चालवेल. अशी माहिती रेल्वे मंत्रालयाने एका निवेदनात दिली आहे.

**जम्मू खेलो इंडिया**

जम्मू आणि काश्मीरच्या प्रसिद्ध दल लेकमध्ये कालपासून तीन दिवसीय खेलो इंडिया वॉटर स्पोर्टस्ची सुरूवात झाली. भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि जम्मू आणि काश्मीर क्रीडा परिषदेच्या सहकार्याने आयोजित या स्पर्धा उद्या संपतील. स्पर्धेचा शुभंकर हा हिमालयन किंगफिशरपासून प्रेरणा घेऊन तयार करण्यात आला. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे आणि जम्मू आणि काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा स्पर्धेच्या उद्घाटनाला उपस्थित होते.

**नेमबाजी**

कझाकस्तानमधील श्यामकेंट इथं सुरू असलेल्या आशियाईनेमबाजी स्पर्धेत भारतीय पुरुष संघानं सुवर्णपदक पटकावलं. अर्जुन बाबुता, रुद्रांक्ष पाटील आणि किरण जाधव यांच्या संघाने पुरुषांच्या 10 मीटर एअर रायफलमध्ये अव्वल स्थान राखलं. या तिन्ही नेमबाजांनी चीनच्या ली झियानहाओ, लूडिंगके आणि वांग होंगहाओ या तिघांना हरवलं. भारताच्या मानसी रघुवंशीने सुवर्णपदक जिंकलं तर यशस्वी राठोडने महिला ज्युनियर स्कीट स्पर्धेत कास्य पदक पटकावलं.

**हवामान**

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, उत्तर गुजरातमध्ये उद्यापर्यंत अतिमुसळधार पावसाची स्थिती कायम राहाणार आहे. तर अरुणाचल प्रदेश, आसाम, नागालँड, मणिपूर, मिझोराम, सिक्कीम, त्रिपुरा, पश्चिम बंगाल, पूर्व राजस्थान तसंच मध्य महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. देशाच्या उर्वरीत भागातही पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार